एस. वाय. बी. ए.  - एस- २

साहित्यविचार

प्रकरण पहिले

घटक -२

# **साहित्याची प्रयोजने**

प्रा. तुकाराम भवर

## साहित्याचे प्रयोजन म्हणजे काय ?

साहित्याचे प्रयोजन सांगणे म्हणजे साहित्याच्या निर्मिती मागील हेतू स्पष्ट करणे होय. प्रतिभावंत साहित्यकृतीची निर्मिती कोणत्या उद्दिष्टाने करतो हा प्रश्न पाश्चात्य जगात पाश्चात्त्य जगात प्लेटो-ॲरिस्टॉटल पासून आणि आपल्याकडे भरता पासून चर्चिला जात आहे. साहित्याचे प्रयोजन हा समीक्षेत एक मध्यवर्ती विचार आहे. या प्रश्नाच्या उत्तरावर सौंदर्य, कला, वांग्मय या सर्वच संकल्पनांचे अर्थ निश्चित होत असतात. या प्रश्नाचे उत्तर त्या-त्या व्यक्तीला जीवनवादी व स्वायत्ततावादी समीक्षा प्रणालीशी जोडून देत असते.

साहित्याचे प्रयोजन एकच एक असावे, असे आपल्याला कितीही वाटले तरी जीवनात माणसांना वेगवेगळ्या भूमिका असतात. प्रत्येक प्रश्नांकडे त्या भूमिकांमधून पाहिले जाते. त्यामुळे प्रश्नांची वेगवेगळी उत्तरे पुढे येतात. साहित्याच्या प्रयोजनासंबंधित येणारी वेगवेगळी उत्तरे ही जीवन भूमिकांची निगडित असतात. त्यामुळे साहित्याची वेगवेगळी प्रयोजने सांगितली गेली आहेत. परिणामी विशिष्ट प्रयोजनाला विशिष्ट भूमिकेचा चेहरा असणे अटळ असते.

- काव्यप्रकाश या ग्रंथात प्रयोजनाची व्याख्या सांगितली आहे.

‘काव्य यशसे, अर्थकृत्ये, व्यवहारविदे,शिवेतरक्षतये, सद्य:परनिर्वृतये, कांतासंमित तयोपदेशयुजे |’

- यश, द्रव्यलाभ, व्यवहारज्ञान, अशुभ निवारण, आल्हाद, उपदेश ही प्रयोजने सांगितली आहेत. तर हेमचंद्राने यामध्ये आनंद, यश उपदेश ही तीनच प्रयोजने मान्य केली आहेत.


साहित्याची प्रयोजने
१ यश
२ अर्थ
३ आत्माविष्कार
४ स्वप्नरंजन
५ मनोरंजन
६ विरेचन
७ जिज्ञासातृप्ती
८ उदबोधन
९ प्रचार

## १) यश :

हे प्रयोजन मम्मट या संस्कृत समीक्षकाने सांगितलेले आहे. यश म्हणजे कीर्ती हे प्रयोजन कवीच्या संदर्भात विचारात घ्यावे असे आहे. काव्यलेखनामुळे कवीला कीर्ती मिळते, प्रसिद्धी प्राप्त होते, प्रसिद्धी प्राप्त होते. चार लोकात आपले नाव व्हावे ही माणसाची एक जन्मजात अपेक्षा असते. अगदी लहान मुलालाही त्याच्याकडे मोठ्या माणसांचे दुर्लक्ष झालेले चालत नाही. काहीही करून ते इतरांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेते. वेगळ्या संदर्भात मोठेपणीही ही प्रवृत्ती टिकते. तेव्हा मानवी जीवनात प्रसिद्धी यश आणि कीर्ती मिळविण्यासाठी लेखन होत असे असे म्हटले जाते. मात्र हे प्रयोजन एका मर्यादेपर्यंतच आहे. उदाहरणार्थ जुन्या काळातील ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम संत कवी आणि अर्वाचीन काळातील केशवसुत बालकवी या कवींनी फक्त यशासाठी लेखन केले असे म्हणणे त्यांच्या बाबतीत अन्यायाचे ठरेल. तेव्हा यश हे प्रयोजन फार मर्यादित अर्थाने घ्यावे लागेल. वाटल्यास त्याला पूरक प्रयोजन म्हणता येईल.

## २) अर्थ :

अर्थप्राप्ती हेही मम्मटाने सांगितलेल्या त्यापैकी एक आहे. आपले जीवन सुखासमाधानाचे बनवायचे असेल, तर माणसाला पैशाची जरुरी असते. आपल्या ठिकाणी वसणाऱ्या श्रम किंवा कसबाच्या जोरावर माणूस अर्थप्राप्ती करून घेत असतो. पैशाच्या मोबदल्यात आपले कसब, आपले श्रम विकणे हे माणसाच्या बाबतीत पुरातन काळापासून चालत आलेले आहे. ते लक्षात घेऊन कवी व लेखक यांच्या बाजूने सांगितले जाणारे हे प्रयोजन आहे. कलावंताने अर्थ प्राप्तीसाठी आपल्याजवळचे कलाकौशल्य पणाला लावणे यात काहीही गैर नाही. कलेच्या जोरावर उपजीविका करणाऱ्या जुन्या मराठी शाहीर कवींचा यासंदर्भात नेहमी उल्लेख केला जातो. कारण कवी कलावंत हा शेवटी माणूसच असतो. त्यालाही घर परिवार असतो चार इतर माणसासारखेच त्याच्याही गरजा असतात आणि त्या भागवायला त्याला पैसा लागतो.

हे सर्व असले तरी केवळ अर्थप्राप्ती हे कलेचे किंवा साहित्य निर्मितीचे प्रयोजन होऊ शकत नाही. रविशंकरसारखा एका कार्यक्रमाचे हजारो रुपये घेत असला. तरी असे पैसे मिळवण्यासाठी त्यांनी ही विद्या संपादन केलेली नसते.

तेव्हा लेखकाच्या दृष्टीने सांगितले जाणारे अर्थप्राप्ती हे प्रयोजन फार तर पूरक असे प्रयोजन म्हणता येते.

## ३) आत्माविष्कार:

दर्शनी स्वरूपात आत्माविष्कार हे लेखकनिष्ठ प्रयोजन आहे. साहित्यकृतीतून लेखक आपले अनुभव व्यक्त करीत असतो. या अनुभवांचे स्वरूप आपण याआधी पाहिलेले आहे. अनन्यसाधारण आणि सर्वसाधारणत्व असे त्याचे दोन महत्त्वाचे विशेष आपण पाहिले आहेत. त्या त्या साहित्यकृतीतून व्यक्त होणारातो अनुभव त्या त्या विशिष्ट लेखक मनाचा आहे. याचे भान राखून सर्वांचा बनत असतो. यातील त्या त्या व्यक्तीमनाचा हा जो पूर्वार्ध आहे. त्याच्याशी आत्मविष्कराची संकल्पना जोडली गेली आहे.

आत्माविष्कार हे साहित्याचे प्रयोजन मानले जाते. त्यामागे एक अशी भूमिका आहे. हे प्रयोजन वाचकनिष्ठ ही समजले जाते. रसिक हा मुका कलावंत असतो आणि कलावंत हा मुका रसिक असतो. असे म्हटले जाते. म्हणजे दोघांच्याही ठिकाणी सौंदर्य वृत्ती असते. फक्त कलावंत ती व्यक्त करू शकतो व रसिकाला ती व्यक्त करता येत नाही. आपले अनुभव व्यक्त केल्याशिवाय चैन पडत नाही म्हणून आत्माविष्कार हे साहित्याचे प्रयोजन ठरते.

## ४) स्वप्नरंजन :

पलायनवादाच्या संकल्पनेतून निर्माण झालेले साहित्य प्रयोजन म्हणजे इच्छापूर्ती किंवा स्वप्नरंजन आहे. ते प्रामुख्याने पाश्चात्य विचारसरणीतून आपल्याकडे आले पुनःप्रत्ययाचा हा सिद्धांत मांडणाऱ्या प्रा.ना.सी. फडके यांनी या प्रयोजनाचा पुरस्कार केला आहे. सांगणारा सुप्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ शॉपेनहोअर याच्या विचारसरणीत या संकल्पनेची मुळे दिसतात. त्याच्या मते मानवी जीवन दुःखमय असून ती दुःखे माणसाच्या वासना तृप्तीसाठी केल्या जाणाऱ्या धडपडीतून संभवतात. वासनेवर विजय मिळवला तर माणूस या दुखा मुक्त होऊ शकतो. माणूस सतत दुःख चुकवण्याचा प्रयत्न करीत असतो. हा पलायनाचा मार्ग त्याला साहित्याच्या आस्वादात सापडतो. हा साहित्यकृतीतून अविष्कृत होणाऱ्या विश्वाशी एकरूप होतो. आणि त्याचे लौकिक विश्व विसरून जातो. हे प्रयोजन लेखक व वाचक दृष्ट्या दोन्ही बाजूने लावता येते. तरी हे प्रयोजन साहित्याच्या निर्मितीचे किंवा आस्वादाचे प्रयोजन म्हणता येत नाही.

## ५) मनोरंजन:

वर सांगितलेल्या स्वप्नरंजन या प्रयोजनाबाबतचे बरेच विवेचन या प्रयोजनासाठी लागू पडणारे आहे. माणूस म्हटला की त्याला मनोरंजनाची गरज भासते. किंबहुना अशी भासणारी जरूरी हा माणूस आणि इतर प्राणीसृष्टी यातील महत्त्वाचा भेद आहे. आणि म्हणूनच असे सांगितले जाते की माणसाच्या्या मानसिक गरजेतूनच साहित्यातील गोष्टी सारख्या प्रकाराचा जन्म झालेला आहे. कुतूहल उत्कंठा गुंतागुंत याचे ताण पेलणे आणि अखेरीस त्यातून सुटकेची स्थिती अनुभवणे यात माणसाच्या मनाला एक प्रकारचे समाधान लाभत असते.

असे असले तरी मनोरंजन हे प्रयोजन लेखक व वाचक यांच्या दृष्टीने सर्वच साहित्याला लावता येणार नाही. शिवाय यातील रंजन हा शब्द बराच गोंधळात टाकणारा आहे त्याचे शब्दकोशातील अर्थ करमणूक मौज असा आहे तेव्हा मनोरंजन आणि अभिरुची यातील संबंध महत्त्वाचा हे सर्वसाधारणपणे मनोरंजनपर म्हटले जाणारे साहित्य दुय्यम दर्जाचे गणले जाते. म्हणून मनोरंजन हे साहित्याचे प्रयोजन सूत्र तितकेसे म्हणता येत नाही

## ६) विरेचन :

विरेचन ही एक फार जुनी संकल्पना आहे. ग्रीक शोकांतिकांचा विचार करीत असताना प्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ अरिस्टॉटल यांनी मांडलेली आहे. त्याने यासाठी यासाठी कॅथार्सिस हा शब्द वापरला आहे. त्याचा मराठी पर्यायी शब्द विरेचन आहे. विरेचन म्हणजे निचरा होणे होणे असा आहे. भावनांच्या विरेचन यामुळे आपल्या चित्तवृत्ती एक हलकापणा येतो. त्यामुळेच आपणास आनंद लाभतो. भीती आणि अनुकंपा या माणसाचे मनस्वास्थ्यबिग होणाऱ्या भावना होत. शोकांतिका या भावनांची जागृती करते. आणि माणसाच्या ठिकाणी वसणाऱ्या याच दोन भावांच्या आधारे त्याचा निचरा करून वाचक प्रेक्षकांच्या मनाचा कोठा साफ करतो. त्यातून मन स्वच्छ झाले की, माणसाच्या चित्तवृत्ती ना एक आल्हाददायक हलकेपणा येतोयासाठी भावनांचे विरेचन होणे आवश्यक आहे म्हणून विरेचन हेच साहित्यकृतीचे प्रयोजन अशी भूमिका दिसते.

## ७) जिज्ञासातृप्ती:

जिज्ञासा किंवा कुतूहल ही माणसाच्या ठिकाणची एक प्रबल अशी जन्मजात प्रेरणा आहे, सृष्टीतील प्रत्येक गोष्टीचे माणसाला नेहमीच कुतूहल वाटत आलेले आहे. त्याने त्यापोटीच कल्पनेच्या जोरावर सृष्टीचे रहस्य शोधण्याचा . त्याच्या परीने आजवर सतत प्रयत्न केलेला / चालविलेला आहे. म्हणूनच अशा मानवीकुतूहलाच्या प्रेरणेला नवनवीन शोधांची जननी असे म्हटले जाते. मानवेतर प्राण्यांत असे कुतूहल दिसून येत नाही. या जिज्ञासेमुळे माणूस जसा जीवनव्यवहाराकडे वळतो, त्याची संगती लावण्यात जास्त जास्त रस घेऊ लागतो. तसेच कलाव्यवहाराचेही आहे. तो त्याकडेही अशा जिज्ञासेपोटीच वळतो आणि त्यात रमत जातो. कारण सर्व विश्वाच्या आकलनाचीच जिज्ञासा त्याच्या ठायी वसत असते आणि आहे ते जीवन असमाधान देणारे म्हणून ते बदलून त्याच्या जागी नवे विश्व उभे करण्याची प्रेरणा म्हणजे नवनिर्मिती, असे डॉ. स. रा. गाडगीळ म्हणतात.

मम्मट या संस्कृत मीमांसकाने सांगितलेले 'व्यवहारज्ञान' हे प्रयोजन जिज्ञासातृप्तीशी मिळतेजुळते आहे, तसेच लागू न पडणारेही आहे.

## ८) उदबोधन :

प्रयोजन म्हणून मानल्या जाणाऱ्या उद्बोधन या शब्दाचा मुख्य घटक ‘बोध' हा शब्द आहे. त्यामुळे प्रथमदर्शनीच साहित्य आणि बोध यांचा संबंध नजरेसमोर येतो. साहित्यातून बोध करावा का, किंवा साहित्य व बोध यांच्यात नेमका संबंध काय आहे, असा प्रश्न आपोआपच यातून निर्माण होतो. या प्रश्नाची चर्चाही जुन्या काळापासून होत आलेली आहे. बोधाचे स्वरूप नेहमीच उपदेशाचे असे मानले गेल्यामुळे, साहित्याकडून बोधाची अपेक्षा केल्यास लेखकाची भूमिका आपोआप उपदेशकाची बनते. त्यामुळे त्याची निर्मात्या कलावंताची भूमिका धोक्यात येते;) तसेच बोधाचा निकटत्वाने नीतीशी, चांगल्या-वाईटाच्या कल्पनेशी संबंध येतो. आचार व विचार या दृष्टीने चांगले किंवा उपकारक असा नीतीचा अगदी स्थूल अर्थ घेतला तरी हा अर्थ स्थळ-काळ-व्यक्तिसापेक्ष असल्यामुळे अडचणी वाढतच जातात. कारण एका काळातील आणि स्थळातील नीतिकल्पना दुसऱ्या काळात व स्थळात बदललेल्या दिसतात; तसेच त्या व्यक्तिनुरूप, त्यांचा व्यवसाय, त्यांचा सामाजिक दर्जा यानुसारही बदलताना दिसतात. तेव्हा इतक्या बदलत्या गोष्टींवर भिस्त ठेवून त्यांच्या अस्थिर व्यवहारात साहित्याने पडू नये असे सांगण्यात येते. ही सर्वसाधारणपणे कलावादी भूमिका झाली. उलट साहित्याचे किंवा कलेचे स्वरूप जीवनाला मार्गदर्शक / उपकारक असायला हवे. तोही एक जीवनान्तर्गत व्यवहार असल्यामुळे त्याचे स्वरूप जीवनविन्मुख किंवा जीवनास अपकारक असता कामा नये, असे जीवनवादी भूमिकेवरून सांगण्यात येते. जीवनवाद्यांच्या मते नीती ही संकल्पना बदलणारी नसते.

## ९) प्रचार :

प्रचार या प्रयोजनाचे स्वरूप थोड्याफार अर्थाने ‘बोधा'सारखेच आहे. तिथे लेखक कलावंत न राहता 'बोधवादी उपदेशक' बनतो हा धोका; तर इथे तो प्रचारक' बनतो हा धोका.

स्वतःला प्रतीत झालेल्या सत्याचा किंवा स्वतःला मान्य झालेल्या तत्त्वाचा प्रचार करण्यासाठी लेखक लेखन करतो असे एक मत दिसते. त्या मागे लेखकाने असे करावे अशी अपेक्षा असते. यामुळे साहित्याला साधनाचे स्वरूप प्राप्त होते.) रशियामध्ये स्टालिनच्या राजवटीत साहित्याच्या बाबतीत ('Social Realism') सामाजिक वास्तववाद किंवा साम्यवादी वास्तववाद या कल्पनेचा उदय झाला आणि नंतर त्याचा आग्रहही धरण्यात येऊ लागला. मग ‘प्रचारा'ला प्रयोजनाची आपोआप प्रतिष्ठा प्राप्त झाली. तिथे साम्यवादाचा प्रचार आणि प्रसार हेच साहित्यनिर्मितीचे प्रयोजन मानण्यात येऊ लागले. साहित्याला साधनाचे स्थान दिले गेले; त्याबाबतही weapon theory म्हणजे एक ‘हत्यारा'चा सिध्दान्तच तयार झाला. समतेवर आधारलेल्या ज्या शोषणरहित, वर्गरहित समाजाची उभारणी साम्यवादास अभिप्रेत आहे त्यासाठी समाजातील प्रत्येक चीज म्हणजे वापरावयाचे हत्यार आणि साहित्य हेही एक असेच हत्यार, असे या सिद्धान्ताचे स्वरूप आहे.

वरीलप्रमाणे मम्मट तसेच इतर अभ्यासकांनी सांगितलेली साहित्याची प्रयोजने आहेत.